**NOIDA INTERNATIONAL UNIVERSITY**
Plot No 1, Sector – 17 A, Yamuna Expressway, Gautam Buddha Nagar, Uttar Pradesh
Website: www.niu.edu.in

NIU INTERNATIONAL JOURNAL OF HUMAN RIGHTS A UGC CARE Listed Journal Volume 9 (IV, 2022 Special Issue ISSN: 2394-0298

NOIDA INTERNATIONAL UNIVERSITY

ज्ञान–विज्ञान विमुक्तये

Volume 9 (IV), 2022 ISSN: 2394-0298

# NIU International Journal of Human Rights

A UGC CARE Listed Journal

## SPECIAL ISSUE

**NOIDA INTERNATIONAL UNIVERSITY**

12. **The Legalisation of Marijuana in India: Issues and Challenges**

Dr. Rahul Sangaonkar 62

**13. राष्ट्रीय एकात्मतेच्या निर्मितीतील भारतीय संविधानाचे योगदान**

**डॉ. तानाजी संभाजी माने** **72**

14. **The Legalisation of Marijuana in India: Issues and Challenges**

Dr. Rahul Sangaonkar 78

15.Comparative Study of Physical Education Teachers from Government and Private Schools in Job Satisfaction and Job Adjustment from Shimla District of Himachal

Dr. Shamsher Singh

16. Comparative Study of Attitude towards Physical Education and Physical Activity of Tribal and Non-Tribal Senior Secondary School Students of Himachal Pradesh

Dr. Shamsher Singh

**18. Role of India in Ukraine and Russia War – A Political Perspective**

**Dr.NiteenTulshiramKatrojwar**

# राष्ट्रीय एकात्मतेच्या निर्मितीतील भारतीय संविधानाचे योगदान

**डॉ. तानाजी संभाजी माने**
लोकमान्य महाविद्यालय,
वरोरा, जी- चंद्रपूर (महाराष्ट्र)
मोबाईल क्र.- 9765223863
Email Id–onlytanaji@gmail.com

**गोषवारा:-**

प्रत्येक देशाचे स्वतःचे संविधान असते.संविधानामुळे देशात कायद्याचे राज्य निर्माण होते.देशाला सातत्य आणि स्थिरता येते. तसेच नागरिकांना अधिकाराची हमी मिळते. संविधान हे देशाचा सर्वोच्च कायदा मानला जातो.भारताचे संविधान हे जगातील इतर संविधानापेक्षा अनेक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण मानले जाते. स्वातंत्र्योत्तर काळात विविध प्रसंगी दिशादर्शन करण्याचे कार्य संविधानाने केले आहे. देशाला एकतेच्या सूत्रात बांधण्यासाठी संविधानातील उद्देशपत्रिका, मूलभूत अधिकार, प्रबळ केंद्र सरकारचा स्वीकार, अल्पसंख्याकांच्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी तरतुदी आणि धर्मनिरपेक्षता अशा विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत. संविधानाच्या प्रस्तावनेतील 'आम्ही भारताचे लोक', 'राष्ट्राची एकता आणि अखंडता' आणि 'बंधुता' या शब्दाचे अध्ययन केल्यास असे लक्षात येते की, भारतीय संविधानाने राष्ट्रीय एकतेला महत्त्व दिले आहे.म्हणून भारताचे भौगोलिक , धार्मिक, भाषिक, जातीय, पंथ, वंश आणि प्रांत इत्यादी बाबतीत विविधता असतानासुद्धा सर्व भारतीयांना एकतेच्या सूत्रात बांधण्यात महत्त्वपूर्ण भूमिका ही संविधानाची राहिली आहे.

**मूळ संज्ञा-** संविधान, राष्ट्रीय एकता, प्रबळ केंद्र सरकार, उद्देशपत्रिका, धर्मनिरपेक्षता इत्यादि .

**प्रस्तावना:-**

भारताच्या संविधान निर्मिती प्रक्रियेला स्वातंत्र्यलढ्याचा वैभवशाली वारसा लाभला आहे. म्हणजेच भारताच्या संविधान निर्मिती प्रक्रियेवर ब्रिटिश शासकांनी पास केलेल्या कायद्याच्या प्रभावा बरोबरच स्वातंत्र्यलढ्यातून उदयास आलेल्या मूल्यांचाही प्रभाव पडला आहे. एकीकडे ब्रिटिश राजवटीतून कायद्याचे अधिराज्य, मानवतावाद, धर्मनिरपेक्षता, व्यक्तिस्वातंत्र्य यासारख्या आधुनिक मूल्यांची भारतीय समाजाला ओळख झाली तर दुसऱ्या बाजूने राष्ट्रवादाच्या बांधणीसाठी स्वीकारण्यात आलेले ऐहिकतेचे तत्व , धर्मनिरपेक्ष मानवतावाद, लोकांना सामावून घेणारी व त्यांना अधिकार प्रदान करणारी लोकशाही पद्धती यासारख्या

स्वातंत्र्यलढ्यातून उदयास आलेल्या मूल्यांचा प्रभाव पडल्याचे दिसून. एकंदरीत भूतकालीन घटना , वर्तमानकालीन परिस्थिती आणि भविष्याचा वेध घेत संविधानकर्त्यांनी संविधान निर्माण केले. "भारतीय समाजधुरिणांनी राज्यघटनेमध्ये राष्ट्राची आदर्श तत्वे तर प्रस्थापित केलीच ; आणि शिवाय ती साध्य करण्यासाठी संस्था आणि त्यांच्या कार्यपद्धतीचीही रचना केली. ही रचना करताना राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता आणि न्याय्य व लोकशाहीधारित समाजनिर्मिती ही राष्ट्राची ध्येय समोर होती." ***(ऑस्टिन& अनु. केळकर , २०१३, p. 06)***

स्वातंत्र्योत्तर काळात भारताला मार्गदर्शन करण्याचे महान कार्य या संविधानाने केले आहे. भारताने एकपक्षीय प्रभुत्व असणारे सरकारे पाहिली , लोकशाहीला ग्रहण लावणाऱ्या आणीबाणीचा अनुभव घेतला , अल्पमतातील व अल्पकालीन आणि आघाडीची सरकारे पाहिली , सोबतच शेजारील देशासोबतच्या युद्धात नेत्रदीपक विजय आणि मानहानीकारक पराभव पचविले , देशांतर्गत बाबतीत धार्मिक-जातीय दंगली अनुभवली इ. अशा वरील बिकट प्रसंगी देशाला दीपस्तंभाप्रमाणे मार्ग दाखविण्याचे कार्य संविधानाने केले आहे. भारतात विविध बाबतीत भिन्नता असताना एकतेची भावना रुजवण्याचे कार्य संविधानाने केले आहे .म्हणून भारताची जागतिक स्तरावर 'विविधतेत एकता असणारा देश ', अशी ओळख राहिली आहे. भारतीय संविधानाच्या महत्त्व याबाबत एस. एल. शकधर म्हणतात , "स्वातंत्र्योत्तर भारताचा इतिहास हा विविध घटना घडामोडीचा राहिला आहे. यावरून असे म्हणता येईल की , संविधानाच्या जवळपास प्रत्येक तरतुदीची राष्ट्रीय जीवनातील वास्तविक परिस्थितीशी सामना करण्याच्या क्षमतेच्या आधारित परीक्षण झाले आहे. " ***(जैन& फाडिया , भारतीयशासनएवंमराजनीति (राज्योंकीराजनीतिसहित), 2008, p. 39)***एकंदरीत भारताला प्रगतीपथावर नेण्याबरोबरच करोडो भारतीयांच्या जीवनाला सार्थक रूप देण्यात संविधानाचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे.

**I) अध्ययनाची उद्दिष्टे :-**

i) भारतीय संविधानातराष्ट्रीय ऐकते संबंधीकरण्यात आलेल्या तरतुदीचा अभ्यास करणे.

ii) राष्ट्रीय एकतेच्या निर्मितीत संविधानाच्या योगदानाचा अभ्यास करणे.

**II) अध्ययनाचे गृहितके :-**

i) भारतीय संविधानात राष्ट्रीय ऐकतेच्या दृष्टीने महत्वपूर्ण तरतुदी केल्या आहेत.

ii) राष्ट्रीय एकतेच्या निर्मितीत संविधानाचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे.

**III) तथ्यांचेविश्लेषणात्मक निर्वचन:-**

**i) संविधानाचा अर्थ:-**

संविधान देशाचा सर्वोच्च कायदा असतो. देशाच्या राज्यकारभारासाठी तयार करण्यात आलेले मूलभूत कायदा म्हणजे संविधान होय. म्हणजेच संविधानाला सर्वोच्च शासन ग्रंथ मानले जाते. प्रो. डायसी यांनी संविधानाची व्याख्या करताना म्हटले की , " संविधान हे त्या सर्व नियमांचा संग्रह आहे की , ज्यांचा राज्याच्या प्रमुख सत्तेच्या वापरावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम पडतो. "***(काश्यपसु. एवंमगुप्त, 2015, p. 91)***यावरून स्पष्ट होते की , संविधानाद्वारे शासनाची रचना, शासनातील विभिन्न विभागाचे संबंध, त्या-त्या विभागाचे अधिकार तथा कर्तव्ये आणि शासक व शासितातील पारस्पारिक संबंध निश्चित केले जातात. आधुनिक अभ्यासकांच्या मते , संविधान म्हणजे केवळ कायद्यांचा संच नाही तर संविधान ही एक सतत क्रियाशील , जीवंत प्रक्रिया आहे. सक्रिय संस्थांचा सजीव संघटन मानले जाते. भारतीय संविधान बद्दल सांगायचे झाल्यास , जगातील एक विस्तृत आणि लिखित संविधान मानले जाते. उद्देशपत्रिकेत भारतीय संविधानाचे तत्त्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न घटनाकारांनी केला आहे. संविधानाच्या तिसऱ्या भागात भारतीयांच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत अधिकाराची तरतूद केली आहे , तर चौथ्या भागात राज्यकर्त्यांना राज्यकारभार करताना दिशादर्शक करणाऱ्या तरतुदींचा समावेश केला आहे. अशा विविध तरतुदीमुळे भारताचे संविधान हे जगातील महत्वपूर्ण संविधानापैकी एक मानले जाते.

**ii) भारताचे संविधान आणि राष्ट्रीय एकता :-**

कोणत्याही राष्ट्राच्या विकासासाठी तथा चिरंतन टिकण्यासाठी एकत्वाची भावना महत्त्वपूर्ण मानली जाते. कारण विखंडित असणारा समाज विकासाचे तथा स्थैर्याचे ध्येय गाठू शकत नाही. याचा भारतीयांनी गतकाळात अनुभव घेतला आहे. या ऐतिहासिक पार्श्वभूमीची संविधानकर्त्यांना जाणीव होती. या सोबतच संविधान निर्मिती वेळी त्यांच्यासमोर वैविध्यपूर्ण असलेल्या भारतीय समाजातील ताण-तणावाची पार्श्वभूमी होती. भारतासारख्या भाषा, धर्म, जात, वंश, प्रदेश व परंपरा यासारख्या विविध अस्मिता असणाऱ्या बहुजन समाजात एकतेची भावना निर्माण करण्याचे आव्हान होते. तसेच संविधानाद्वारे निर्धारित केलेली उद्दिष्टे साध्य करीत असताना देश अखंडित राहील याची देखील हमी देणे अत्यावश्यक होते. म्हणूनच राष्ट्राचे ऐक्य व अखंडत्व यास मध्यवर्ती मानण्यात आले. पुढे चालून 1976 साली संविधानात 42 वी घटनादुरुस्ती करून उद्देशपत्रिकेत 'राष्ट्राची एकता' या शब्दा ऐवजी 'राष्ट्राची एकता आणि अखंडता ' या शब्दाचा समावेश केल्यामुळे एकतेच्या आदर्शाला आधार मिळाला. संविधान कर्त्यांनी राष्ट्रीय एकतेच्या भावनेचे महत्त्व लक्षात घेऊन संविधानात महत्त्वपूर्ण तरतूदी केल्या आहेत

**a) उद्देशपत्रिका :-**

प्रत्येक देशाच्या संविधानाला काही निश्चित ध्येय असतात. त्या ध्येयांचा/ उद्देशांचा संविधानाच्या प्रस्तावनेत उल्लेख केलेला असतो. म्हणजेच उद्देशपत्रिका ही त्या त्या संविधानाचा सार असते. भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका ही जगातील इतर देशाच्या संविधानाच्या उद्देशपत्रिकेपैकी अतिउत्तम मानली जाते. तसा अभिप्राय जागतिक कीर्तीचे विचारवंत असणाऱ्या अर्नेस्ट बार्करंनी नोंदविला आहे. तर काही अभ्यासकांनी उद्देशपत्रिकेला भारतीय संविधानाचा आत्मा व गुरुकिल्ली असे संबोधले आहे. या उद्देशपत्रिकेत संविधानाचे तत्त्वज्ञान मांडण्याबरोबरच भारतीय समाजाला एकतेच्या सूत्रात बांधणारे तत्वज्ञान मांडले आहे. संविधान सभेत उद्दिष्टांचा ठराव संमत करण्यात आला. पंडित नेहरूंनी या ठरावाचा मसुदा तयार केला होता. त्यात म्हटले होते की, "भारतीय राज्यसंघाची एकसंधता टिकून ठेवण्यासाठी तिची अधिसत्ता आणि सत्ता भारतीय जनतेकडून घेतलेली आहे." ***(जाधव& शिरपूरकर, 2011, p. 10)***

उद्देशकेतील 'आम्ही भारताचे लोक' यातील 'आम्ही' चा संविधानाला अभिप्रेत असलेला अर्थ 'आम्हीच' असा नसून तो 'आपण सारेजण' असा आहे. म्हणूनच उद्देशकेतील आम्हीच्या अगोदर किंवा नंतर जात, धर्म, लिंग, वर्ग, राजकीय किंवा अन्य विचारप्रणालींचा अगदी दुरपर्यंत सूचक असा उल्लेख संविधानात नाही. संविधानकर्त्यांनी 'आम्ही भारताचे लोक' या शब्दाचा प्रयोग करून अंतिम सत्ता ही जनतेकडे असेल असे स्पष्ट केले आहे. म्हणजेच शासनाला प्राप्त असणारी सत्ताही जनतेकडून मिळाली आहे. भारतीय संविधानातील आम्ही भारताचे लोक यातून भारतीय संविधानाचा उगमस्त्रोत म्हणून जनता असल्याचे स्पष्ट केले आहे. या शब्दाचा दुसरा अर्थ स्पष्ट करताना सुभाष काश्यप म्हणतात की, "आम्ही भारताचे लोक या वाक्याचा आणखी एक अर्थ आहे आणि तो म्हणजे आम्ही भारताचे लोक आहोत, राज्याचे नाही आणि भारताचे लोक एक आहोत." ***(काश्यप, 2009, p. 329)***तसेच संविधानाची निर्मिती ही राज्य किंवा अनेक राज्याच्या लोकांनी केली नसून संपूर्ण भारतातील लोकांनी त्यांच्या सामूहिक क्षमतेने केले आहे.

यासोबतच उद्देशपत्रिकेत 'बंधुता' या शब्दाचा समावेश केला आहे. या मागचा उद्देश असा की , भारतात स्पृश्य-अस्पृश्यता, सांप्रदायिकता, प्रादेशिकवाद, जातीयता, भाषावाद आणि धार्मिक संघर्ष यासारख्या कारणांमुळे आपल्या देशासमोर विविध समस्या निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे देशाचे ऐक्य व एकात्मता कायम ठेवण्यासाठी लोकांमध्ये बंधुत्वाची भावना निर्माण करणे आवश्यक आहे , याची जाणीव संविधान कर्त्यांना होती. एकंदरीत न्याय, स्वातंत्र्य आणि समता या तत्वावर उभारलेल्या या नवस्वतंत्र राष्ट्रातील लोकांमध्ये आपण एक आहोत म्हणजे बंधुत्वाची भावना वृद्धिंगत करणे हे शासनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. बंधुत्वाची भावनाही

समाजातील लोकांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण करते. वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की , भारतीय संविधानाचे सार समजल्या जाणाऱ्या उद्देशपत्रिकेत राष्ट्रीय एकतेला चालना देणाऱ्या मूल्यांचा समावेश केला आहे. यामुळे स्वतंत्र भारताच्या वाटचालीत राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लावण्यासाठी निश्चितच चालना मिळाली आहे.

**b) प्रबळ केंद्र सरकार:-**

राष्ट्रीय एकतेसाठी संविधानात करण्यात आलेल्या तरतुदी पैकी महत्त्वपूर्ण तरतूद म्हणजे प्रबळ केंद्र सरकारचा केलेला स्वीकार होय. ज्या-ज्यावेळी देशाची मध्यवर्ती सत्ता दुर्बळ झाली , त्या- त्यावेळी हा देश परकीय आक्रमणाला बळी पडला होता. हा अनुभव संविधानकर्त्यांच्या गाठीशी होता. तसेच विविधता असणाऱ्या देशाला एकसंध ठेवण्याचे कार्य हे आव्हानात्मक होते. हा पेच सोडविण्यासाठी संविधानकर्त्यांनी लोकशाही शासनाच्या चौकटीत संघराज्य पद्धतीचा स्वीकार केला. मात्र संघराज्य पद्धतीच्या भारतीय परिस्थितीच्या अनुषंगाने कांही उणीवा होत्या. त्या म्हणजे कठोर सविधान , केंद्र-राज्यातील अधिकाराचे विशिष्ट स्वरुपात केलेले विभाजन आणि दोन्ही सत्ता स्थानांना आप-आपल्या क्षेत्रात स्वतंत्ररीत्या अधिकाराचा वापर करण्याचा अधिकार इत्यादी. संविधानकर्त्यांना संघराज्य व्यवस्थेतील उणिवांची जाणीव होती. देशातील तत्कालीन परिस्थिती पाहता शक्तिशाली केंद्र शक्तीची आवश्यकता होती."एक सुदृढ, स्थिर आणि शक्तिशाली सरकारच विभाजनवादी प्रवृतीचा सामना करू शकते आणि राष्ट्रीय एकता स्थापित करू शकते. त्यामुळे केंद्र बळकट करणे आवश्यक होते. " ***(मल, 2007, p. 90)***

केंद्र मजबूत करण्याच्या उद्देशाने संविधानात अशा काही तरतुदींना स्थान देण्यात आले. ज्या सामान्यतः एकात्म शासन व्यवस्थेचे वैशिष्ट्य मानली जातात. उदा- राज्य प्रशासनात केंद्र शासनाचा बाह्य हस्तक्षेप, राष्ट्रपतीद्वारा राज्यपालांची नियुक्ती , सत्ता विभाजनात केंद्राला झुकते माप , समवर्ती सूची बाबतीतही राज्यापेक्षा केंद्राच्या कायद्यांना महत्त्व , अखिल भारतीय सेवा , एकेरी न्यायव्यवस्था , एकेरी नागरिकत्व , राज्यविधिमंडळाद्वारा पास केलेल्या काही विधेयकाला राष्ट्रपतीच्या संमतीची आवश्यकता , आणीबाणी विषयक अधिकार, शेषाधिकार केंद्राकडे इत्यादी. यामुळे काही अभ्यासकांनी भारतीय संघराज्याच्या उल्लेख 'अर्ध संघराज्य', 'सहयोगी संघराज्य ' असा केला आहे. सर आयव्हर जेनिंग्ज यांच्या मते , "भारतामध्ये प्रबळ केंद्रीकरणाचे धोरण असलेली संघराज्य व्यवस्था आहे." ***(मल, भारतकासंविधान, 2007, p. 292)***एकंदरीत भारतीय शासन व्यवस्थेचे स्वरूप जरी संघराज्यात्मक असले तरी आत्मा हा एकात्म स्वरूपाचा आहे.

स्वतंत्र भारताच्या वाटचालीत राष्ट्रांतर्गत आणि जागतिक पातळीवरील परिस्थितीतील बदलामुळे प्रबल केंद्र शासनास पुष्टी मिळत आहे.उदा-देशांतर्गत होणारे दंगे , महापूर, कोरडा दुष्काळ यासारखी नैसर्गिक आपत्ती आणि अलीकडे आलेल्या कोरोना सारख्या महामार्गामुळे राज्याचे केंद्रावरील अवलंबित्व वाढण्यास हातभार लावला आहे. तसेच शेजारील पाकिस्तान व चीनशी असलेले तणावपूर्ण संबंध इ. एकंदरीत भारताच्या संविधानात एकीकरण्याच्या प्रक्रियेवर अधिक भर दिला आहे. जगातील कोणत्याही संघराज्यात्मक व्यवस्थेत भारताइतके प्रबळ केंद्र शासनाचा पुरस्कार केल्याचे दिसून येत नाही. प्रबळ केंद्र सरकारच्या संविधानातील तरतुदीमुळे भारताचे राष्ट्रीय ऐक्य आणि अखंडत्व टिकून राहिले आहे. तसेच देशाच्या ऐक्याला व अखंडत्वाला आव्हान देणाऱ्या फुटीरतावादी प्रवृत्ती फोफावण्यास पोषक वातावरण निर्माण झाले नाही.

**c) अल्पसंख्यांकांच्या हितसंबंधांचे संरक्षण:-**

भारताच्या संविधानात राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टिकोनातून सामाजिक परिवर्तनाला प्राधान्यक्रम देण्यात आल्याचे दिसून येते. म्हणजेच संविधान निर्मितीचा महत्त्वाचा उद्देश हा सामाजिक क्रांती घडून आणण्याचा हा राहिला आहे. संविधानकारांना याची जाणीव होती की , शतकानुशतके अन्याय , अत्याचाराने पिचलेला समाज हा विकासाच्या परिघाबाहेर राहिला आहे. अशा समाजाला विकासाच्या प्रवाहात आणणे आवश्यक आहे. राजकीय लोकशाही बरोबरच सामाजिक-आर्थिक लोकशाहीची स्थापना करणे आवश्यक आहे. यासाठी संविधानातील उद्देशिका , मार्गदर्शक तत्वे , आरक्षणाची व्यवस्था यातून अल्पसंख्यांक आणि मागास वर्गाच्या उत्थानासाठी संरक्षणात्मक तरतुदी करण्यात आल्या आहेत. याबाबत संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मत मांडले की , "अल्पसंख्यांकांना सुरक्षितता देण्याचे कार्य शहाणपणाने केले आहे. या देशात अल्पसंख्यांक व बहुसंख्यांक अशा दोन्ही समूहांनी चुकीचा मार्ग अवलंबला आहे. ..... या प्रश्नावर असे उत्तर हवे की, ज्याचा दुहेरी उपयोग होईल. प्रथम अल्पसंख्यांकांचे अस्तित्व मान्य केले पाहिजे. जेणेकरून बहुसंख्य व अल्पसंख्य हे दोन प्रवाह नष्ट होऊन त्यातून एक दिवस एकच एक मुख्य प्रवाह निर्माण होईल. " ***(गायकवाड , 2008, p. 63)***

संविधानाच्या उद्देशपत्रिकेत सामाजिक , आर्थिक, राजकीय न्यायाचा उल्लेख केला आहे. या सोबतच संविधानाच्या तिसऱ्या भागात म्हणजे मूलभूत अधिकारात देखील अल्पसंख्यांकांच्या हक्क रक्षणाची हमी देणाऱ्या तरतुदीचा समावेश केला आहे. कलम 29 व 30 मध्ये 'संस्कृती आणि शिक्षणाचा अधिकार' देण्यात आला आहे. म्हणजेच संविधानाने या कलमांतर्गत अल्पसंख्यांकांना त्यांच्या संस्कृतीचे जतन करण्याच्या अधिकारा बरोबरच

त्यांच्या सांस्कृतिक स्वातंत्र्याचा भाग म्हणून शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा आणि चालविण्याचा अधिकार दिला आहे. अशाच प्रकारची भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्क रक्षणाची तरतूद कलम 350 (क), (ख) मध्ये केली आहे. ती म्हणजे 'भाषिक अल्पसंख्य गटातील मुलांना प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच मिळावे. यासाठी प्रत्येक राज्य आणि त्यातील प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रयत्नरत रहावेत', अशा तरतुदी संविधानात समाविष्ट करून संविधानकर्त्यांनी अल्पसंख्यांकांना आपलेसे मानले आहे. तसेच राष्ट्रीय ऐक्याच्या प्रस्थापनेकरिता समाजातील प्रत्येक वर्गाला राजकीय व्यवस्थेत सहभागाची संधी देण्याच्या उद्देशाने संविधानातील सोळाव्या भागात आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. म्हणजेच अनुसूचित जाती व जमातींना राजकीय सहभागाची संधी देण्यासाठी लोकसभा आणि राज्यविधानसभा मध्ये राखीव जागेची तरतूद केली आहे. एकतेच्या स्थापनेकरिता समाजातील प्रत्येक वर्गाला राजकीय व्यवस्थित सहभागाची संधी देणे आवश्यक आहे. याबाबत प्रो. रजनी कोठारी म्हणतात की , "भारतासारख्या विशाल देशात जिथे विविध प्रकारचे लोक राहतात , तिथे राजकीय सत्ता आणि अधिकारातील सर्व घटकांची विभागणी करून आणि सर्वांना सोबत घेऊनच एकता प्रस्थापित केली जाऊ शकते. यासाठी आवश्यकता आहे ती समाजातील सर्व वर्गामध्ये राजकीय संस्थांचा प्रवेश झाला पाहिजे. राजकारणाच्या या विधायक भूमिकेतूनच एकीकरणाच्या प्रवृत्तींना बळकटी मिळते."***(जैन& फाडिया, 2008 , p. 860)***

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की , देशातील अल्पसंख्यांक असणारा वर्ग आणि विकासापासून दूर राहिलेल्या वर्गाच्या हक्क संरक्षणासाठी संविधानात तरतुदी करण्यात आले आहेत. यासोबतच त्यांचा विकास व्हावा यासाठी त्यांना विविध अधिकार देण्यात आले आहेत. राजकीय सहभागासाठी राखीव जागेची तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदीमुळे या वर्गांना मुख्य प्रवाहात आणण्याची मोठी कामगिरी बजावलेली आहे. यामुळे सहाजिकच भारतीय समाजाची परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे. या वाटचालीकरिता संविधानकारांनी ज्या राष्ट्रीय एकात्मता आणि स्थैर्य या ध्येयाचा स्वीकार केला होता , त्याच्या प्राप्तीसाठी मार्गक्रमण सुरू झाली आहे असे म्हणता येईल.

**d) धर्मनिरपेक्षता:-**

धर्मनिरपेक्षता हे भारतीय संविधानाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. भारतीय समाजव्यवस्थेतील धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या विविधता , आधुनिक भारतामध्ये निर्माण झालेला जमातवादाचा प्रश्न आणि त्यातून झालेल्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर ते लोकांनी शांततेच्या स्थापनेसाठी धर्मनिरपेक्ष राज्य व समाजाची नितांत

आवश्यकता समोर आली. संविधानकर्त्यांनी सुरुवातीसच धर्मनिरपेक्ष राज्याचा पुरस्कार केला. "संविधानकर्त्यांनी धर्म, जात, पंथ या सर्व विविधतेच्या पलीकडे असलेल्या राष्ट्राचे स्वप्न पाहिले होते. ते धर्माच्या विरोधात नव्हते , पण त्यांनी अशी आशा व्यक्त केली की , राजकीय एकता साधणे शक्य होईल आणि राष्ट्र निर्मितीत धार्मिक मतभेद अडथळा ठरणार नाही. " ***(काश्यप, हमारासंविधानभारतकासंविधानऔरसंवैधानिकविधि, 2012, p. 54)***तसेच धर्माच्या किंवा इतर आधारावर वेग-वेगळे मतदारसंघ असावेत काय ? असा प्रश्न संविधान सभेपुढे आला. हा प्रश्न निकाली काढण्याकरिता मतदार यादी एकच असेल. ते धर्म अथवा समुदायाधारित नसेल आणि कोणत्याही व्यक्तीला धर्म व जात आदी कारणावरून मतदार यादीतील समावेशास अपात्र ठरविता येता येणार नाही , अशी तरतूद कलम 325 मध्ये करण्यात आली. या तरतुदींच्या अधीन राहूनच पुढे अनुसूचित जाती , अनुसूचित जमाती समाजाला काही प्रमाणात राखीव मतदारसंघ देण्यात आले. एकंदरीत संविधानाचा मसुदा हा सामाजिक हेतू जपणारा होता. म्हणूनच धर्माच्या आधारे राजकीय विखंडन नाकारण्यात आले. पंडित नेहरूंनी संविधानातील धर्मनिरपेक्षतेचा आशय व्यक्त करताना असे मत मांडले की , " धार्मिक विविधता असणार या देशात सामाजिक स्थैर्य व सुसंवाद जपण्यासाठी धर्मनिरपेक्षता ही एक व्यावहारिक गरज ठरते. " ***(जाधव& शिरपूरकर, भारतीयराज्यघटनावघटनात्मकप्रक्रिया, 2011, p. 19)***वरील विवेचनामुळे धर्मनिरपेक्षतेची संकल्पना स्पष्ट होण्यास मदत झाली.

यासोबतच संविधानातील मूलभूत अधिकाराच्या प्रकरणातून धर्मनिरपेक्षतेची संकल्पना स्पष्ट होते. कलम 25 ते 28 मध्ये 'धर्मस्वातंत्र्याशी संबंधित सर्व जनतेचे मूलभूत हक्क' नमूद करण्यात आली आहे. ज्यात प्रत्येक व्यक्तीला धर्म स्वीकारण्याचे , आचरणात आणण्याचे आणि त्याचा प्रसार करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. धर्मस्वातंत्र्याचा हक्क देऊन उद्देशपत्रिकेतील आश्वासित केलेल्या 'विश्वास', 'श्रद्धा' आणि 'उपासनेचे स्वातंत्र्य' याची अंमलबजावणी केली आहे. धर्मस्वातंत्र्याच्या अधिकारामुळे भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरूप हे सर्वांना धर्माचे स्वातंत्र्य देणारे धर्मनिरपेक्ष राष्ट्र असे बनले आहे. याबाबत दुर्गादास बसू म्हणतात की , "धर्मनिरपेक्ष राज्याचा आदर्श परिकल्पित करून अनेक धर्मांमध्ये विश्वास ठेवणाऱ्या भारतातील जनतेची एकी आणि बंधुत्व साध्य करण्याचा प्रयत्न केला गेला आहे, ज्याचा अर्थ असा आहे की राष्ट्र धर्माचे समान संरक्षण करते आणि कोणताही एक धर्म राष्ट्रधर्म म्हणून मानत नाही. " ***(बसू, 2015, p. 31)***वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की , संविधानातील धर्मस्वातंत्र्याच्या अधिकाराचे भेदभाव रहितता, धार्मिक सहिष्णुता आणि सामाजिक सलोखा ही वैशिष्ट्ये आहेत. यामुळे भारतात सामाजिक ऐक्य साधले गेले आहे. परिणामी राष्ट्रीय एकता साधण्यास मदत झाली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या वाटचालीचा आढावा घेतल्यास असे लक्षात येते की , संविधानकर्त्यांनी धर्माच्या पलीकडील राष्ट्राचे पाहिलेले स्वप्न सत्यात उतरताना दिसत आहे. धर्मनिरपेक्षतेमुळे देशाचे ऐक्य अबाधित राहण्यास मदत झाली आहे.

**IV) समारोप:-**

वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की , भारतात राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्मितीमध्ये निश्चितच संविधानाची महत्वपूर्ण भूमिका राहिली आहे. संविधानातील उद्देशपत्रिका, मूलभूत अधिकार, अल्पसंख्याकांच्या हितसंबंधाच्या रक्षणासाठीच्या तरतुदी आणि प्रबळ केंद्र शासनाचा स्वीकार यातून एकात्मतेबाबत तरतुदी केल्याचे दिसून येते. यामुळे भारतातील विविधतेत एकता साधण्यात आली आहे.

**V) निष्कर्ष:-**

i) भारताच्या संविधानात राष्ट्रीय एकात्मतेबाबत विविध तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे.

Ii) उद्देशपत्रिकेतील 'आम्ही भारताचे लोक', 'राष्ट्राची एकता आणि अखंडता ' आणि 'बंधुता' या शब्दातुन राष्ट्रीय एकात्मतेचे तत्वज्ञान स्पष्ट होते.

iii) भारतातील विविधतेत एकता टिकविण्यासाठी संविधाकर्त्यांनी प्रबळ केंद्र सरकारचा स्वीकार केला. त्यामुळे भारताच्या अखंडत्वाला आव्हान देणाऱ्या प्रवृत्तीवर आळा बसला आहे.

iv) अल्पसंख्यांक वर्ग आणि विकासापासून दूर राहिलेल्या वर्गाच्या हक्क संरक्षणासाठी संविधानात तरतुदी करण्यात आले आहेत. या तरतुदीमुळे या वर्गांना मुख्य प्रवाहात आणण्याची मोठी कामगिरी बजावलेली आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेसाठी पोषक वातावरणाची निर्मिती झाली आहे.

v) संविधातील धर्मनिरपेक्षतेच्या तरतुदीमुळे सामाजिक ऐक्य साधले गेले आहे. त्याचा परिणाम राष्ट्रीय एकता साधण्यास मदत झाली आहे.

**संदर्भ सूची:-**

ऑस्टिन, ग., &अनु. केळकर , भ. (२०१३). *भारताचीराज्यघटनाराष्ट्राचीकोनशिला.*पुणे: डायमंडपब्लिकेशन्स.

काश्यपसु. एवंमगुप्त, व. (2015). *राजनीतिकोश.*दिल्ली: हिंदीमाध्यमकार्यान्वयननिदेशालय, दिल्ली .

काश्यप, स. (2009). *भारतकासंविधानिकविकासऔरसंविधान.*दिल्ली : हिंदीमाध्यमकार्यान्वयननिदेशालयदिल्लीविश्वविद्यालयतृतीयसंस्करण .

काश्यप, स. (2012). *हमारासंविधानभारतकासंविधानऔरसंवैधानिकविधि.*नईदिल्ली: नेशनलबुक .

गायकवाड , ज. (2008). *संविधान-सभेतडॉ. आंबेडकर.*पुणे: पद्मगंधाप्रकाशनतृतीयावृत्ती.

जाधव , त., &शिरपूरकर, म. (2011). *भारतीयराज्यघटनावघटनात्मकप्रक्रिया.*पुणे: दयुनिकअकॅडमी.

जाधव, त., &शिरपूरकर, म. (2011). *भारतीयराज्यघटनावघटनात्मकप्रक्रिया.*पुणे : दयुनिकअकॅडमी.

जैन, प., &फाडिया , ब. (2008). *भारतीयशासनएवंमराजनीति (राज्योंकीराजनीतिसहित).*आगरा: साहित्यभवनपब्लिकेशन्सपंधरावासंस्करण.

जैन, प., &फाडिया, ब. (2008 ). *भारतीयशासनएवंमराजनीति (राज्योंकीराजनीतिसहित).*आगरा : साहित्यभवनपब्लिकेशन्सपंधरावासंस्करण.

बसू, द. (2015). *भारतीयराज्यघटनेचीओळख.*गुरगाव: लेक्सिसनेक्सिसपब्लिकेशन्सदुसरीआवृत्ती.

मल, प. (2007). *भारतकासंविधान.*जयपूर: अविष्कारपब्लिशर्सडिस्ट्रीब्युटर्स.

मल, प. (2007). *भारतकासंविधान.*जयपूर: अविष्कारपब्लिशर्सडिस्ट्रीब्युटर्स.